# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा- सन २०२५-२६

**-:संयोजक:-**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**

**ता. वाळवा, जि. सांगली**

**शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा- सन २०२५-२६**

- **संयोजक – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **प्राचार्य – डॉ. नितीन शिंदे मो. नंबर – ९४२३२७१६३६**
- **शारीरिक शिक्षण संचालक – प्रा. अमितराज उत्तमराव माने**
- **मो. नंबर – ७२१९५११७७७**
- **स्पर्धा ठिकाण – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **स्पर्धा कालावधी- ०२ दिवस (०७,०८ नोव्हेंबर २०२५)**
- **स्पर्धा क्रीडा प्रकार – व्हॉलीबॉल (पुरुष)**
- **संयोजन समिती -**

-: येणेप्रमाणे असे :-

| अ. क्र | सदस्याचे नाव | पदनाम | सही |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.नितीन शिंदे | अध्यक्ष | |
| २ | उपप्राचार्य डॉ. पी.व्ही.गायकवाड | सदस्य | |
| ४ | उपप्राचार्य डॉ. संदीप एस. पाटील | सहसचिव | |
| ५ | डॉ. एस. के. माने | सदस्य | |
| ६ | डॉ. पी. ए. गंगणमाले | सदस्य | |
| ७ | डॉ. संदेश जिरगे (सिनी.कार्याध्यक्ष ) | सदस्य | |
| ८ | डॉ.बी.ए.सावंत | सदस्य | |
| ९ | डॉ. टी. टी. जगताप | सदस्य | |
| १० | डॉ. पी. एम. आठवले | सदस्य | |
| ११ | डॉ.सौ.एस.पी.परदेशी | सदस्य | |
| १२ | डॉ. अमितराज उत्तमराव माने | सचिव | |
| १३ | श्री. व्ही. व्ही. गुरव | सदस्य | |
| १४ | श्री.अजित यशवंत पाटील | प्रशासकीय कर्मचारी | |

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**अंतर्गत**
**सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा सन २०२५-२६**
**-:संयोजक:-**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
**ता. वाळवा, जि. सांगली**

---

## -: स्पर्धा अहवाल :-

दि. ०७ व ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेचे उदघाटन झाले. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूरचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. सुनील पाटील(साहेब), कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. संदेश दौंडे, वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथे कार्यरत असणारे तालुका क्रीडा अधिकारी मा. जमीर आत्तार, सांगली जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे पदाधिकारी मोहन पाटील व प्रकाश पाटील, जेष्ठ शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एच. ए. नारायणकर, त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. ॲड. एन आर पाटील (काका) यांनी खेळाडूंना शुभेच्या देताना आपल्या मनोगतातून खेळाचे महत्व व त्यामुळे होणारे फायदे आपणास कसे मिळतात याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्या दिल्या. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने यांनी केले तर आभार प्रा. कमलेश ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप पाटील यांनी केले. राज्य संघटनेचे पंच श्रीकांत पाटील, सुरज पाटील, महेश पाटील, सुरज पवार, अजित पाटील व प्रेम दंडवते या स्पर्धेचे काम पाहतील. या स्पर्धेमध्ये सांगली जिल्ह्यातील एकूण ०७ संघांनी सहभाग घेतला आहे.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांचे हस्ते झाले त्यांनी सर्व विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या तर ज्यांना विजय मिळवता आला नाही अशा सर्व खेळाडूंनी अधिक परिश्रम करून पुन्हा नव्या जोमाने स्पर्धेत भाग घ्यावा असे सांगितले. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. अजित पाटील, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एम टी. खंडेलोटे, त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना कॉलेजच्यावतीने ट्रॉफी देण्यात आल्या. तर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व पंचांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेतून विजयी झालेले संघ दि. १८ व १९ नोव्हेंबर २०२५ रोजी कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेत खेळतील. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी सहकार्य केले. तर जिमखाना विभागाचे प्रा. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.

- **स्पर्धेतील विजेते संघ** :-

  **१. विलिंग्डन कॉलेज सांगली - प्रथम क्रमांक**

  **२. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूर - द्वितीय क्रमांक**

  **३. आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज पलूस - तृतीय क्रमांक**

  **४. सी. आय. एम. डी. आर सांगली - चतुर्थ क्रमांक**







